

**चौगुले महाविद्यालयाचे अधिव्याख्याता श्री विजयकुमार नाझरे यांना अमेरिकेतील 'फुलब्राइट' संस्थेची फेलोशिप (अधिछात्रवृत्ती) प्रदान.**

श्रीमती पार्वतीबाई चौगुले महाविद्यालयाच्या उच्च माध्यमिक विभागात रसायनशास्त्र या विषयाचे अध्यापन करणारे श्री विजयकुमार नामदेव नाझरे यांना अमेरिकास्थित फुलब्राइट या संस्थेकडून अधिछात्रवृत्ती प्रदान करण्यात आली आहे.

जागतिक पातळीवरील शैक्षणिक दर्जा उंचावण्याकरिता, फुलब्राइट या संस्थेकडून राबवल्या जाणाऱ्या TEA (टिचिंग एक्सलैंस अँण्ड अचिव्हमेंट प्रोग्रॅम) या योजने अंतर्गत संपूर्ण भारतातून निवड झालेल्या एकूण सहा सन्मान्य सदस्यांपैकी श्री विजयकुमार नाझरे हे एक आहेत.

विन्थ्रोप युनिव्हर्सिटी, साऊथ कॅरोलिना येथे सहा आठवडे राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमामध्ये जगभरातील विविध ३९ देशांतून एकूण ८० सदस्य सहभागी होणार आहेत. ३१ जानेवारी २०१२ ते २३ मार्च २०१२ या कालावधित राबवल्या जाणाऱ्या या कार्यक्रमामध्ये यू.एस्. विद्यापीठातील अध्ययन, अध्यापन प्रक्रिया समाजातून घेणे, तेथील शिक्षक व विद्यार्थांशी संपर्क साधणे, शैक्षणिक दर्जा उंचावणाऱ्या नवनविन प्रक्रियांचे प्रत्यक्ष अध्ययन करणे यांचा समावेश असणार आहे.

श्री नाझरे यांच्या या यशाबद्दल, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी तसेच चौगुले महाविद्यालयाचे व्यवस्थापन मंडळ यांनी त्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या अमेरिकेतील वास्तव्याकरिता शुभेच्छा दिल्या आहेत.

*******************************************************************************